**पोलीस उप-आयुक्त,गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड**
पोलीस आयुक्त कार्यालय,पिंपरी चिंचवड,प्रेमलोक पार्क,चिंचवड,पुणे - ३३
**दुरध्वनी क्र.** ०२०-२७३५०१२० ई मेल आयडी – dcphq.pcpc-mh@gov.in

# प्रेसनोट

## मित्राने मोबाईल खिशातुन काढुन घेतल्याच्या रागातुन मित्रानेच मित्राच्या डोक्यात दगड घालुन खुन करुन नेपाळ येथे पळुन जाण्याच्या तयारीत असणा-या आरोपीस १२ तासाच्या आत अटक करण्यात गुन्हे शाखा, युनिट १, पिंपरी चिंचवड पोलीसांना यश

दि.२६/०५/२०२३ रोजी बालाजीनगर एम.आय.डी.सी भोसरी येथील मयत इसम नामे **नारायण वाघमारे** यांने त्याचा मित्र नामे **अमर ऊर्फ एक्क्या** याचा खिशातुन मोबाईल फोन काढुन घेतल्याच्या रागातुन अमर ऊर्फ एक्क्या याने त्याचा मित्र नारायण वाघमारे याच्या डोक्यात दगड घालुन गंभीर जखमी केले होता. सदर गंभीर गुन्हयाच्या अनुषंगाने **एम.आय.डी.सी भोसरी गु.र.न २२३/२०२३ भादवी कलम ३०७** अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.सदर गुन्हयाचे अनुशंगाने मा पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे सो,मा.पोलीस उप आयुक्त (गुन्हे) स्वप्ना गोरे यांनी गुन्हे शाखा युनिट १ चे पोनि संतोष पाटील यांना तात्काळ आरोपीना शोधुन ताब्यात घेण्याबाबत आदेश दिले. त्याप्रमाणे सदर आरोपीचा शोध घेत असताना **पो.हवा.खानविलकर व पो.ना.मोरे** बातमीदारा मार्फत माहिति मिळाली की गुन्ह्यामधिल पाहिजे आरोपी नामे अमर ऊर्फ एक्क्या हा गुन्हा करुन नेपाळ येथे पळुन जाणार असुन तो सद्या लोणावळा रेल्वे स्टेशन,लोणावळा, ता.वडगाव मावळ, जि.पुणे येथे असल्याची खात्रीशिर माहिती मिळाल्याने वरिष्ठांचे परवानगीने लागलीच लोणावळा येथे जावुन. तेथील पोलीस उप निरीक्षक युवराज बनसोडे, व स्टाफ, लोणावळा ग्रामीण पोलीस स्टेशन यांची मदत घेवुन लोणावळा रेल्वे स्टेशन, लोणावळा, ता.वडगाव मावळ, जि.पुणे येथे गेलो असता बातमीप्रमाणे वर्णनाचा एक इसम सदर ठिकाणी मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवून त्याचा नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव **अमर ऊर्फ एक्क्या गौतम कसबे, वय २४ वर्षे, रा. यशवंतनगर, सेक्टर ७, एम.आय.डी.सी भोसरी, पुणे** असे असल्याचे सांगितले. त्यास सदर गुन्हयाचे कामी एम.आय.डी.सी भोसरी पोलीस ठाणे येथे हजर केले आहे. सदर गुन्हयातील जखमी इसम नामे **नारायण वाघमारे हा ससुन हॉस्पीटल, पुणे येथे उपचारा दरम्यान दिनांक २६/०५/२०२३ रोजी मयत झाला आहे. सदर गुन्हयास भा.दं.वि कलम ३०२ हे वाढविण्यात आले आहे.**

Scanned with CamScanner

सदरची कारवाई **पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, सह पोलीस आयुक्त संजय शिंदे, अप्पर पोलीस आयुक्त वसंत परदेशी, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) स्वप्ना गोरे, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संतोष पाटील, पोलीस उपनिरीक्षक इम्रान शेख, पोलीस अमंलदार अमित खानविलकर, सचिन मोरे, प्रमोद गर्जे, मनोजकुमार कमले, मारोती जायभाये व टी.ए.डब्ल्यु विभागाचे नागेश माळी,** यांनी केली आहे.

**(स्वप्ना गोरे)**
पोलीस उप आयुक्त,
गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड

Scanned with CamScanner